नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १५५ Issue - 155 | वार शनिवार दि. २५ ऑक्टोबर २०२५ Blow- Saturday Date 25 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# बस अपघातात २५ जणांचा होरपळून मृत्यू

## आंध्र प्रदेशातील कर्नूल जिल्ह्यातील घडली घटना; मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख तर जखमीना दोन लाखांची मदत जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : आंध्र प्रदेशातील कर्नूल जिल्ह्यात झालेल्या भीषण बस अपघातात २५ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शोक व्यक्त केला आहे. कर्नूल जिल्ह्यातील अपघातामुळे झालेले मृत्यू अत्यंत दुःखद आ-हेत', असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. हैदराबादहून बंगळुरूला जाणाऱ्या एका खा-जगी बसने दुचाकीला धडक दिल्यानंतर हा अपघात झाला. अपघातानंतर बसने पेट घेतला, ज्यात दुचाकीस्वारासह २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांची ओळख पटवणे कठीण झाले आहे. पंतप्रधान कार्यालयाने मृतांच्या नातेवाईकांना २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची मदत जाहीर केली आहे. तर, तेलंगणा सरकारने मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख आणि जखमींना २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

आंध्र प्रदेशातील कुरनूल जिल्ह्यात भीषण बस अपघातात २५ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. २४ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास खा-जगी प्रवासी बसला आग लागून ही दुर्घटना घडली. अपघाता-वेळी बसमध्ये ४० जण प्रवास करत होते. आगीत अनेक जण होरपळून गंभीर जखमी झाल्यामुळे मृतांचा आकडा वाढून ३२ वर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

हैदराबाद-बंगळुरु महामार्गावर आंध्र प्रद-ेशातील कुरनूल जिल्ह्यात चिन्ना टेकुरु गावाजवळ हा अपघात झाला. कावेरी ट्रॅव्हल्सची बस एका म ोटारसायकलला धडकली. ही धडक इतकी भीषण होती, की बसने पेट घेतला आणि काही मिनिटांतच बस जळून खाक झाली.



प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, आग इतकी वेगाने पसरली की बहुतेक प्रवासी काही कळायच्या आतच आत अडकले. १२ जण कसेबसे बाहेर पडले. काहींना भाजल्याच्या जखमा झाल्या, मात्र बहुतांश जण आगीत जळून खाक झाल्याचे मानले जात आहे. रात्रीची वेळ असल्यामुळे अनेक प्रवासी झोपेत होते, त्याम ुळे कोणाला बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही.

अग्निशमन दल आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी पोहोचली असून त्यांनी आग विझवण्यासाठी आणि मृतदेह बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अधिकृतपणे मृतांचा आकडा अजून जाहीर झालेला नाही, पण आगीच्या भीषणतेवरून मृतांचा आकडा मोठा असण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी मृतांच्या कुटुंबियांकडे शोक व्यक्त केला. त्यांनी जिल्हा अधिकाऱ्यांना त्वरित मदतकार्य आणि जखमींना वैद्यकीय मदत देण्याचे निर्देश दिले. ही एक अत्यंत दुःखद घटना आहे, असे ते म्हणाले. त्यांनी या घटनेच्या कारणांचा आणि काही त्रुटी राहिल्या असल्यास त्याचा तपास करण्याचेही सांगितले.

याआधी, १४ ऑक्टोबर रोजी जयसलमेरहून जोधपू-रला जाणारी बस थाईयत गा-वाजवळ पेटली होती. त्यात २२ जणांचा मृत्यू झाला होता, ज्यात तीन मुलांचाही समावेश होता. त्या घटनेत, बसच्या एअर कंडिशनिंग सिस्टीममध्ये शॉर्ट सर्किट झाल्यामुळे गॅस लीक झाला आणि त्यामुळे आग लागल्याचा अंदाज होता.

काही दिवसांच्या अंतराने देशात बस पेटून दोन भीषण घटना घडल्याने खाजगी वाह-तूक कंपन्यांच्या प्रवासी सुरक्षा आणि देखभालीच्या मानकांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतातील अनेक लांब पल्ल्याच्या खाजगी बस कमी नफ्यावर चालतात. त्यामुळे अनेकदा नियमित तपासणी आणि सुरक्षा तपासणीकडे दुर्लक्ष केले जाते.

कुरनूलमध्ये बचावकार्य सुरू आहे. अधिकारी मृतांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क साधण्यासाठी काम करत आ-हेत. बसचा जळालेला सांगाडा पोलिसांनी सील केला आहे.

# विरोधकांच्या एकीमुळे भाजप एकाकी; लक्षवेधी लढतीत महाशक्तीला रोखले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू काश्मीरच्या राज्यसभेच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. चारपैकी तीन जागा जिंकत सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सनं ताकद दाखवली आहे. तर भाजप ला एका जागेवर यश मिळालं आहे. जम्मू काश्मीरमध्ये भाजप प्रमुख विरोधी पक्ष आहे.

जम्मू काश्मीरला असलेला विशेष राज्याचा दर्जा २०१८ म ध्ये रद्द करण्यात आला. यानंतर दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती झाली. जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आले. यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये प्रथमच राज्यसभेची निवडणूक झाली. या ऐतिहासिक निवडणुकीत भाजप विरोधक एकवटले. त्यामुळे भाजप-ला केवळ एक जागा जिंकता आली. राज्यात सत्ताधारी असलेल्या नॅशनल कॉन्फरन्सनं तीन जागा खि-शात घातल्या. काँग्रेस , पीडीपीनं नॅशनल कॉन्फरन्सला साथ दिली. त्यामुळे तिसरी जागा जिंकण्यासाठी पुरेसं संख्याबळ नसतानाही नॅशनल कॉन्फरन्सचा तिसरा उमेदवार विजयी झाला.



**ऐतिहासिक निर्णयानंतरचा पहिला विजय**

नॅशनल कॉन्फरन्सचे चौधरी मोहम्मद रमजान, सज्जाद अहमद किचलू आणि शमी ओबेरॉय यांनी विजय मिळवला. तर भाजपच्या सत शर्मा यांनी बाजी मारली. त्यांना ३२ मतं मि ळाली. सत शर्मा जम्मू काश्मीर भाजपचे अध्यक्ष आ-हेत. नॅशनल कॉन्फरन्सच्या चौधरी मोहम्मद रमजान यांच्या समोर भाजपच्या अली मोहम्मद मीर यांचं आव्हान होतं. मीर यांचा पराभव झाला. दुसऱ्या जागेसाठी एनसी-चे सज्जाद अहमद किचलू आणि भाजपचे राकेश महाजन आमनेसामने होते. इथे महाजन पराभूत झाले. फारुख अब्दुल्ला आणि उमर अब्दुल्ला विजयी उमेदवारांच्या अभिनंदनासाठी जम्मू काश्मीर विधानसभेत पोहोच-ले. जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत एनसी सर्वात मोठा पक्ष आहे. त्यांच्या आमदारांची संख्या ४२ इतकी आहे. तर भाजपच्या आमदारांची संख्या २९ इतकी आहे. एका उमेदवाराच्या विजयासाठी १९ मतं गरजेची होती. हा कोटा लक्षात घेता एनसीचे २ उमेदवार विजयी होऊ शकत हो-ते. पण काँग्रेस, पीडीपीसह भाजप विरोधकांनी एनसीला साथ दिली. त्यामुळे एनसीचे तीन उमेदवार विजयी झाले. विरोधकांची एकी झाल्यानं भाजपला एका जागेवर सम ाधान मानावं लागलं.

# पावसाचा जोर कायम; मेघगर्जनेसह पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिवाळी संपली तरी राज्यभरात सुरू असलेला पाऊस आणि सकाळच्या वेळी वाढलेले तापमान यामुळे मुंबईकर हैराण झाले असून नेमका कोणता ऋतू सध्या सुरू आहे हेच कळत नसल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. दिवाळीही पावसाच्या प्रभावाखाली संपल्यानंतर नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातही पाऊस असल्याने वर्षभर पावसाळाच अनुभवायचा का, असा प्रश्न विचारला जात आहे. दुपारच्या वेळी असह्य होणारा उकाडा आणि उन्हे तापल्याने छत्री घरात ठेवल्यानंतर संध्याकाळी अचानकपणे उपस्थिती लावणारा पाऊस यामुळे मुंबईकरांची शुक्रवारी त्रेधा उडाली.

दक्षिण मुंबईमध्ये शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास जोरदार पाऊस सुरू होऊन मुंबईकर जागोजागी अडकण्याचीही स्थिती निर्माण झाली. मुंबईमध्ये मेघगर्जनेसह पावसाचा इश-ारा दिलेला असला तरी एखाद-दु-सरी सर येऊन पाऊस थांबेल, असा मुंबईकरांचा अंदाज होता. मात्र जोरदार पावसामुळे या अंदाजांवरही पाणी फिरल्याचे दिसले. अरबी समुद्रात निर्माण झालेले तीव्र कमी दाबाचे क्षेत्र उत्तर आणि ईशान्य दिशेने प्रवास करत असून, शुक्रवार, २४ ऑक्टोबर रोजी हे क्षेत्र पणजीपासून ३८० किलोमीटरवर स्थित होते. यासोबतच बंगालच्या उपस-ागरातही कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. परिणामी राज्यामध्ये पावसाळी वातावरण निर्माण झाले असून, वातावरणातील आर्द्रता वाढल्याने ऑक्टोबरअखेरीस मुंबईत किमान तापमानाचा पारा २७ अंशांवर पोहोचला आहे. सांताक्रूझ येथे शुक्रवारी सकाळी किमान तापमानाची नोंद सरासरीपेक्षा चार अंशांनी अधिक झाली. मुंबईमध्ये कमाल तापमानाचा पारा चढला असताना वातावरणातील आर्द्रतेमुळे किमान तापमानही अधिक आहे. त्यामुळे सकाळच्या वेळीही उकाड्याची जाणीव तीव्र होत आहे. कुलाबा येथे शुक्रवारी २५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. सकाळच्या वेळी कुलाबा येथे ८१ टक्के तर सांताक्रूझ येथे ७८ टक्के आर्द्रता



नोंदली गेली. कुलाबा येथे कमाल तापमान ३३.८ अंश तर सांताक्रूझ येथे कमाल तापमान ३५.३ अंश सेल्सिअस नोंदले गेले. सांताक्रूझ येथील कमाल तापमान सरासरीपेक्षा १.१ अंशांनी अधिक होते. प्रादेशिक हवाम ान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार शनिवारी आणि रविवारी महामुंबई परिसरामध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

शुक्रवारी मुंबईतच नव्हे तर पुणे, लोहगाव, अहिल्यानगर, जळगाव, म ालेगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, परभणी, अकोला, बुलडाणा, नागपूर, यवतमाळ या केंद्रांवरही किमान तापम ानाचा पारा सरासरीहून तीन अंश किंवा अधिक फरकाने चढलेला होता. लोहगाव येथे किमान तापमान सरासरीहून ६.३ अंशांनी अधिक तर नाशिक येथे किमान तापमान सरासरीहून ६.१ अंशांनी अधिक असल्याची नोंद झाली. शुक्रवारी संध्याकाळी मुंबई, नवी मुंबई, ठाणे जिल्ह्यात संध्याकाळच्या वेळी पावसाने हजेरी ला-वली. दक्षिण मुंबईत संध्याकाळच्या सुमारास पाऊस पडला. हाजी अली, ब्रिटानिया पंपिंग स्टेशन, नायर रुग्णालय येथील स्वयंचलित हवामान केंद्रांवर २० ते २५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. तर उत्तर मुंबईत ५ ते १० मि लीमीटर पावसाची नोंद झाली.

कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता लक्षात घेता आज, शनिवारी आणि उद्या, रविवारी पूर्व मध्य आणि आग्नेय अरबी समुद्रामध्ये जाऊ नये असा इश-ारा मच्छिमारांना देण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र, गुजरातची किनारपट्टी, केरळ, करनाटकची किनारपट्टी येथेही समुद्रात जाऊ नये असे भारतीय हवाम ान विभागाने सांगितले आहे.

**ब्लॅकलिस्ट आणि रेशन कार्ड पडताळणीचे आदेश** — **नव्या सूचना जारी**


# बांग्लादेशी घुसखोरांना आळा बसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात वाढत्या बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांवर नियंत्रण आणण्यासाठी फडणवीस सरकारने म ोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आणि संबंधित विभागांना बांगलादेशी नागरिकांची ब्लॅकलिस्ट तयार करण्याचे तसेच शिधापत्रिका पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच नव्या शिधापत्रिकेसाठी नव्या मार्गदर्शक सूचना देखील जारी करण्यात आल्या आहेत.

राज्यात वाढत्या बांगलादेशी स्थलांतरितांमुळे उद्भवणाऱ्या सुरक्षेच्या धोका लक्षात घेऊन शासनाने तातडीचे निर्देश दिले आहेत. या अंतर्गत, बेकायदेशीर स्थलांतरितांची माहिती दहशतवाद विरोधी पथकाकडे पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य शासनाने बांगलादेशी बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विषयावर अंतर्गत विचारमंथन सत्रांचे आयोजन



करण्याचे निर्देश दिले आहेत. या चर्चेचा अहवाल ढड कडे सादर करावा असे आदेश देण्यात आले आहेत. तसेच अशा स्थलांतरितांची काळी यादी तयार करून त्यांना शासकीय कल्याण योजना लाभ न देण्याचे आदेश दिले आहेत.

एटीएस कडून प्राप्त झालेल्या १,२७४ बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांच्या यादीतील व्यक्तींची पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या व्यक्तींच्या नावावर कोणतेही अधिकृत दस्तऐवज, जसे की आधार, पॅन किंवा रेशनकार्ड जारी झाले असल्यास, ते तात्काळ रद्द किंवा निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ढड कडे अहवाल पाठवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या व्यतिरिक्त, पुढे उघडकीस येणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरितांची यादी तयार करून ती विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे विभागीय आणि क्षेत्रीय कार्यालयांना दक्षता ठेवता येईल.

स्थानिक प्रतिनिधींच्या शिफारशीवरून शिधापत्रिका वितरित करताना अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे आणि राहण्याचे ठिकाण काटेकोर तपासावे, असा निर्दे श देण्यात आला आहे. शासना-ने सांगितले आहे की, या सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी केली जावी आणि कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल सरकारकडे सादर करावा.

राज्यात वाढत्या बांगलादेशी घुसखोरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारने उचललेले हे पाऊल सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. यामुळे बेकायदेशीर स्थलांतरितांना शासकीय लाभांचा गैरवापर रोखण्यात मदत होणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरण सोहळ्याला मुख्यमंत्री, जरांगे पाटील एकाच व्यासपीठावर येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पहिल्यांदाच एकाच व्यासपीठावर दिसणार असल्याची माहिती समोर आली आहे. येत्या २६ ऑक्टोबर रोजी मंगळवेढा येथे होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरण सोहळ्याला या दोन्ही नेत्यांची उपस्थिती निश्चित झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना आणि तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

या भव्य सोहळ्याचे आयोजन भाजप-चे पंढरपूर-मंगळवेढा आमदार समाधान अव-ताडे यांनी केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण होणार असून, मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनाही कार्यक्रमासाठी अधिकृत निमंत्रण देण्यात आले आहे. त्यांनी या सोहळ्यास उप-स्थित राहण्याचे मान्य केले आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे. या कार्यक्रमाला राज्यातील अनेक मंत्री, खासदार, आमदार तसेच सर्व पक्षांचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचेही अवताडे यांनी सांगितले.



मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस आणि मनोज जरांगे पाटील एका स्टेजवर दिसणार असल्यामुळे या कार्यक्रमाचे राजकीय महत्त्व प्रचंड वाढले आहे. पुतळा समितीचे सदस्य कौंडू भैरी यांनी सांगितले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर योग्य तो न्याय देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे जरांगे दादांनीही या अनावरण सोहळ्यास उपस्थित राहण्यास म ान्यता दिली आहे, असे त्यांनी म्हटले.

यापूर्वी मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे यांच्या उपोषणस्थळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेले नव्हते. ओबीसी समाजाची नाराजी वाढू नये म्हणून सरकारने त्या वेळी सावध भूमिका घेतली होती. मात्र, आता दोघेही एकाच व्यासपीठावर येणार असल्याने राजकीय वर्तुळात याबाबतची जोरदार चर्चा रंगली आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व जाती धर्मांचे आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असल्याने या अनावरण सोहळ्याला सर्वच पक्षाचे नेते आणि सम ाज मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनोज जरांगे एकाच व्यासपीठावर दिसणार का? हे २६ ऑक्टोबरला स्पष्ट होईल.

## संपादकीय....

### महाशक्तीला रोखले

जम्मू काश्मीरच्या राज्यसभेच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. चारपैकी तीन जागा जिंकत सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सनं ताकद दाखवली आहे. तर भाजप ला एका जागेवर यश मिळालं आहे. जम्मू काश्मीरमध्ये भाजप प्रमुख विरोधी पक्ष आहे. जम्मू काश्मीरला असलेला विशेष राज्याचा दर्जा २०१८ मध्ये रद्द करण्यात आला. यानंतर दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती झाली. जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आले. यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये प्रथमच राज्यसभेची निवडणूक झाली. या ऐतिहासिक निवडणुकीत भाजप विरोधक एकवटले. त्यामुळे भाजपला केवळ एक जागा जिंकता आली. राज्यात सत्ताधारी असलेल्या नॅशनल कॉन्फरन्सनं तीन जागा खिशात घातल्या. काँग्रेस , पीडीपीनं नॅशनल कॉन्फरन्सला साथ दिली. त्यामुळे तिसरी जागा जिंकण्यासाठी पुरेसं संख्याबळ नसतानाही नॅशनल कॉन्फरन्सचा तिसरा उमेदवार विजयी झाला. नॅशनल कॉन्फरन्सचे चौधरी मोहम्मद रमजान, सज्जाद अहमद किचलू आणि शमी ओबेरॉय यांनी विजय मिळवला. तर भाजपच्या सत शर्मा यांनी बाजी मारली. त्यांना ३२ मतं मिळाली. सत शर्मा जम्मू काश्मीर भाजपचे अध्यक्ष आहेत. नॅशनल कॉन्फरन्सच्या चौधरी मोहम्मद रमजान यांच्या समोर भाजपच्या अली मोहम्मद मीर यांचं आव्हान होतं. मीर यांचा पराभव झाला. दुसऱ्या जागेसाठी एनसीचे सज्जाद अहमद किचलू आणि भाजपचे राकेश महाजन आमनेसामने होते. इथे महाजन पराभूत झाले. फारुख अब्दुल्ला आणि उमर अब्दुल्ला विजयी उमेदवारांच्या अभिनंदनासाठी जम्मू काश्मीर विधानसभेत पोहोचले. जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत एनसी सर्वात मोठा पक्ष आहे. त्यांच्या आमदारांची संख्या ४२ इतकी आहे. तर भाजपच्या आमदारांची संख्या २९ इतकी आहे. एका उमेदवाराच्या विजयासाठी १९ मतं गरजेची होती. हा कोटा लक्षात घेता एनसीचे २ उमेदवार विजयी होऊ शकत होते. पण काँग्रेस, पीडीपीसह भाजप विरोधकांनी एनसीला साथ दिली. त्यामुळे एनसीचे तीन उमेदवार विजयी झाले. विरोधकांची एकी झाल्यानं भाजपला एका जागेवर समाधान मानावं लागलं.

# मध्यप्रदेशातील प्रथेवर घणाघात करणारी बाजारी विकलेली नार : एक सामाजिक आशय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीनंतरही मुंडा व त्यावाची होणारा मुलींचा छळ आपण थांबवू शकली नाही. काही ठिकाणी तर मुलींचे पालक मुलीची विक्री करतात, हे त्याहून लच्छास्यद अहे है सम अजूनही होत असेल तर कला, साहित्य, सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक क्षेत्रात विधायक सुधारक म्हणून जबाबदाऱ्याही नाटक चित्रपट मालिका यांचा मूल्यगामी परिणाम समाज मनावर होतो, पण फत्ता व्यवसाय या एकाच ध्येयाने या क्षेत्रातील मंडळी असतील तर कलेतील सामाजिक दायित्त्वाची मूल्ये साभाळायची कुणी? समाजसुधारकांचा सामाजिक वारसा पुढे चालविण्यात आपण कुठे कमी पडतो याचे विचारमंथन होणे गरजेचे वाटते. म्हणून समाजिक वास्तवाची जान, बाजारी विकलेली नार बहुचर्चित झाली आहे.

४०-५० वर्षापूर्वी आपल्या महाराष्ट्र राज्यातील विदर्भाच्या काही ग्रामीण भागात शंकर पटाच्या वेळी बायका पळवायच्या अशी माहिती कानावर वयोवृद्ध नागरिकांकडून आली. ज्या माणसाला बायको नावाची व्यक्ती हवी असेल तर त्याने शंकरपटात जाऊन आवडीच्या स्त्रीचा हात पकडून घरी घेऊन जायचे. यावर कुणी काही म्हणत नव्हते. हे बराच काळ चालले अशि प्रकारातून स्त्री जातीची किंमत कमी होताना वाटली.

झाडीपट्टी रंगभूमीवर शिवम थिएटर्स निर्मित बाजारी विकलेली नार हे युक्रराज गोगले याचे नवे नाटक बहू चर्चित आहे. मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील घडीचा या कुप्रथेच्या नावावर होणारी स्त्रियांची खरेदी विक्री है या नाटकाचे कथानक आहे. ही प्रथा अलीकडे काहीशी कमी झाली असली तरीही अगदी स्टॅम्प पेपरवर लिहून मुलींची विक्री झाल्याची काही नमुने पुढे आली आहेत. त्यामुळे





हा गंभीर विषय हाताळून विषयाचा एक नवा प्रवाह युवराज गोंगले यांनी झाडीपट्टी रंभूमीवर निर्माण केला आहे. ही रंगभूमी पूर्व विदर्भातील लोकरंगभूमी म्हणून विख्यात आहे.

सारे तर असे गंभीर विषय व्यावसायिक अपयशाच्या भीतीने झाडीपट्टी रंगभूमीवर शक्यतो टाकले जातात, पण युबराज गोगले यांनी या रराभूमीच्या अलीकडे लोकप्रिय आणि व्यावसायिकासामध्ये हा विषय समर्थपणे मांडण्याचे कसब दाखविले आहे. त्यामुळे सांस्कृतिक व सामाजिक बांधिलकी फारच जवळील होईल. मानवाला याची जाणीव होईल. भारतीय संविधानानुसार महीला जातीचे हक्क अधिकार कळतील.

एखाद्या पत्रातीय सत्यघटनेवर मराठी नाट्यकृती जन्माला घालताना कथेचे नुसते प्रादेशिक भाषांतर करून चालत नाही तर कालाचे भान राखत इथल्या भाषिक आणि सास्कृतिक साच्यात ते कथानक बसवावे लागते. आणि त्याच संवेदनेने प्रयोगयोजना करावी लागते, पण हे पथ्य झाडीपट्टी रंगभूमीवर साभाळल्या जात नाही. युवराज गोंगले हे स्वता लेखक, दिग्दर्शक, नट, गायक आणि सातत्याने नवे मार्ग चोखाळणारे सर्जनशील संगीतकार असल्याने प्रयोगाच्या मांडणीत समस्या आली आहे. संवाद आणि गीतांत बोलीचा प्रभाव लेखकांनी पाडला आहे.

मध्यप्रदेशातील हिंदी गोंडी माडिया या भाषेचा योग्य विकाणी केलेला प्रयोग लेखकाच्या सांस्कृतिक जाणिवा प्रगल्भ करण्याचा जोरदार प्रयत्न जमला आहे.

**कथानकात शिरताना....**

काजली आणि तिचा प्रियकर सारस यांच्या प्रेमाचे साधे कथानक, पण घरचा बाप आणि भाऊ अशी राची माणसेच काजी व तिची बहीण पारिजा यांची भर बाजारात विक्री करता आई कुणाची साथ नाही विक्रीसाठी अशा की मूल आणखी का पैदा केल्या नाहीत करणारा धनलोभी दुराचारी भाऊ आणि तनमन चुक्रय झाली अशी खंत सहक्या सात बाळगणारा कुकर्मी नराधम बाप अशी इकडे पैशाच्या लालसेपोटी श्यामोन्मानून तिच्या देहाचा वारंवार पार सुहाने पेहलेली नाही आणि तिकडे रात्री ही करणारा वासनांध, लंपट सासर नावाचा धंदेवाईक उका यातून हे नाटक सामाजिक कुप्रथा व स्त्रियांचे हक्क चावर मानवी चेतना जागविणारे अनेक प्रकल विचारून हुक्रमी पुरुषी मनसिकतेला हादरे देत राहते आणि या सर्वांशी लावला सिद्ध झालेला प्रियकर मांडण्यात आणि प्रत्यक्ष प्रयोगातून तो पेलण्यात

**भूमिका साकारणारी चमू**

युवराज गोंगले यशस्वी झाले आहेत ममता गोगते। जी) (रोग) ही. एन. राजा। रामसू), प्रणय देठी (कोरण्यामा (पंचला, दिलखुश कुधाकर (बेनिराम विजय वाटकर रखवालदार), बांदीप टेकाम (इकरीडाला), ऋतू पारिजा। मेघना (डाऊनरी), पल्लवी (मुस्की) ही कुठलेही मोठे नाव नसणारे नवोदित कलावत, पण सर्वांनी अगदी सरस भूमिका केल्या आहेत येथील विनोदी प्रसंग व यात्रेसुद्धा कथानकाची विषयाच्या संवेदना उजागर करतात गाणी व संवादातून होणारा झाडीबोलीचा वापर दखलपात्र ठरातो. कारण बोलीतील संवाद सामान्य माणसाच्या हृदयाचा तव घेतात आवडतेस व सारखे प्रेमगीत आणि द्विता विठ्ठला कारो पार्श्वगीत मध्य प्रदेशातील कोला मराठी साज मदविण्यात साहाभूत ठरले आहेत.

मुलगी शिकली तर परीवार शिकला म्हणतात. हे खरे आहे. लेक शिकवा-देश शिकवा याप्रमाणे आजची स्त्री ही देशाचे रक्षण करणारी समाजाला दिशा दाखविणारी आहे. तर समाज देश व परीवार सांभाळून चालविणारी एक महान नायिका आहे. अशा नायिकांना सलाम केला पाहिजे. यामुळे आज देशात नैतिक मूल्ये जोपासणे सहज सोपे झाले आहे. भारतीय संविधानानुसार सर्वांना महत्त्वाचे अधिकार, न्याय हक्क प्राप्त झाले आहे. ती कुप्रथा बंद पाडण्यासाठी हे वास्तववादी चित्र नाटकाच्या माध्यमातून समाजापुढे ठेवले आहे.

**निष्कर्ष :**

१) स्त्री समाजाचा कणा आहे.

२) संविधानानुसार स्त्री ही विश्व निर्माती आहे.

३) स्त्री जननी असून कर्तबगार समजाचा घटक आहे.

४) सामाजिक नेतृत्व आहे.

५) गुलामीला गाळून स्वाभिमान जोपासणारी आहे.

**– प्रा. मुन्नाभाई नंदागवळी,**
**– ९७६४६७६४९९**
**नाट्यसमीक्षा**
**नाटक– बाजारी विकलेली नार**
**लेखक: युवराज गोंगले**

# शेटफळ येथील जिव्हाळा ग्रुपच्या वतीने किल्ले बांधणी स्पर्धेची बक्षीस वितरण व गावातील गुणवंतांचा सन्मान संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेटफळ तालुका करमाळा येथील जिव्हाळा ग्रुप च्या वतीने ऑइल किल्ले बांधणी स्पर्धेचे बक्षीस वितरण, गावातील गुणवत्तांचा सन्मान व गरजूंना दिपवाळी भेट देण्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की लहानपणीच मिळालेल्या स्वनिर्मितीचा आनंद हा पुढील आयुष्यभर आत्मविश्वास मिळवून देत असतो त्यामुळे किल्ले बांधणी सारख्या स्पर्धेचे वेगवेगळे महत्त्व असून यामधून शालेय वयातील मुलांना ऐतिहासिक वारसा जपण्याची प्रेरणा ही मिळते या कार्यक्रमाला विक्रीकर निरीक्षक महेश तोरमल, अन्नसुरक्षा अधिकारी रोहित लोकरे, तसेच पोलीस उपनिरीक्षक अमित लबडे भारतीय सैनिक आकाश पोळ उपस्थित होते.

पुढे बोलताना राऊत म्हणाले की लहानपणातील ठराविक वयामध्ये जे विचार संस्कार मनावर रुजले जातात पुढील आयुष्यात दडणघडणीमध्ये त्याची महत्त्व अनन्य साधारण असते त्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम महत्त्वाचे असतात सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचे स्वागत ग्रुपचे वैभव पोळ विजय लबडे प्रशांत नाईक नवरे डॉक्टर सुहास लबडे प्रमोद मोरे यांनी केले व कार्यक्रमाची प्रास्ताविक प्राध्यापक सचिन भेंडे यांनी ग्रुपच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली व यावेळी कीर्तनकार विठ्ठल पाटील महाराज, अमित लबडे, रोहित लोकरे, महेश तोमलि आकाश पोळ यांची भाषणे झाली.

यावेळी भारतीय हँडबॉल संघात निवड झाल्याबद्दल ओंकार लबडे निधी विषयातून विशेष प्रामान्य मिळवून वकिलांची सनद मिळाल्याबद्दल कन्हैया पाटील, ऑस्ट्रेलियातील हेल्पर विद्यापीठात शिक्षणासाठी निवड झालेल्या धीरज सुरज लावंड इजिप्त देशाची कंपनी प्रोजेक्टसाठी निवड झालेली गौरव गुंड, वैद्यकीय पदवी मिळाल्याबद्दल सुधीर निंबाळकर, टाटा टेक्नॉलॉजी कंपनीमध्ये निवड झाल्याबद्दल ऋषिकेश माने, करण्यात आला तर भाजप महिला मोर्चा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हर्षली नाईक नवरे, कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल नानासाहेब साळुंखे, तसेच तसेच ६०० कामगिरीबद्दल मनोज जाधव यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी गावातील गरजूंना मान्यवरांच्या हस्ते दिवाळी भेट देण्यात आली.

या कार्यक्रमाला माजी सरपंच मुरलीधर पोळ, आदिनाथ चे माजी संचालक सुरेश पोळ, विलास लबडे राजाभाऊ रोंगे महाराज बापू महाराज नाईक नवरे महावीर निंबाळकर गंगाधर पोळ राजेंद्र साबळे, वैभव शिंदे, साहेबराव पोळ, पांडुरंग नाईक नवरे समाधान गुंड उदयसिंह पाटील संतोष घोगरे ऋषिकेश घोगरे यांच्या सह ग्रामस्थ आणि उपस्थित होते व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र पोळ यांनी केले तर आभार नवनाथ नाईक यांनी मांडले.




# वंदे मातरम ग्रुपच्या वतीने दिवाळी सांजपाडवा कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दीपावली पाडव्याच्या निमित्ताने निफाड शहरात सांस्कृतिक वारसा जपत वंदे मातरम ग्रुपच्या वतीने युवा सेना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे यांचे मार्गदर्शनाखाली दीपावली सांजपाडवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, मंडळाचे हे अकरावे वर्ष असून यावेळी मुंबई येथील राजमुद्रानिर्मित ३५ कलाकारांची टीमने विविध लोकप्रिय अशा मराठी गाणी व नृत्य ,लोककलेचा अनोखा असा कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली, कार्यक्रमाची सुरुवात लेझीमच्या तालावर गणेश आराधनेणे करण्यात आली. या वेळी उजळून आलं आभाळ, डौलमोराच्या मानाचा, पाटलाचा बैलगाडा, चंद्रा, आली माझ्या घरी दिवाळी ,कोळी बांधवांचे आई तुझं देऊळ, अशा लोकप्रिय गाण्यांसह, पोवाडा, चवदार तळ्याचा प्रसंग ,त्याचप्रमाणे शिवरायांचा राज्याभिषेक आदी प्रसंग सादर केले ,असून श्री स्वामी समर्थांचे वेशभूषा केलेल्या कलाकारांनी विशेष असे सादरीकरण करून प्रेक्षकांची दाद मिळविली.

या कलाकारांचा सन्मान वि.दा व्यवहारे यांच्या हस्ते करण्यात आला, दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्कर भगरे यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमास लाभली ,कार्यक्रमाची निमित्ताने वंदे मातरम ग्रुपच्या वतीने भाग्यवान श्रोत्यांना २१ महिला व २१ पुरुष यांना आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला, यावेळी निफाड शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले

# सावखेड भोई जि.प. सर्कल मधून पक्षाने संधी दिल्यास निवडणूक लढविणार प्रमेश्वर खंदारे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात १३आक्टोंबर रोजी निघालेल्या आरक्षणानुसार सिंदखेडराजा तालुक्यातील दुसरबिड जिल्हा परिषद सर्कलमध्ये अनुसूचित जाती महीला व देऊळगाव राजा तालुक्यातील सावखेड भोई जिल्हा परिषद सर्कलमध्ये अनुसूचित जाती आरक्षण निघाल्याने .हे दोन जिल्हा परिषद सर्कल सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघ येत असून.आमदार मनोज कायंदे सावखेड भोई जिल्हा परिषद सर्कल मधून अटीतटीच्या लढती मधून दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य होऊन . जिल्हा परिषदेचे विरोधी पक्षनेते पद भुषविले आहे. सावखेड भोई जिल्हा परिषद सर्कल वरती आमदार मनोज कायंदे यांची पकड मजबूत असल्याने सावखेड भोई जिल्हा परिषद सर्कलमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव झाल्याने . अनेक एसी उमेदवारांनी सर्कल वरती लक्ष केंद्रित केले आहे. परंतु येथे नव्याने पक्षात प्रवेश करणाऱ्यांना संधी मिळते का . आमदार मनोज कायंदे एकनिष्ठेने सोबत काम करणाऱ्याना संधी देतात . आमदार कायंदे उमेदवारांची चाचपणी झाल्यानंतरच येणारा काळच ठरवेल. सिंदखेडराजा तालुक्यातील.कोनाटी गावचे सलग दोन वेळा सरपंच असलेले प्रमेश्वर खंदारे.स्व. देवानंद भाऊ कायंदे यांच्या तालमीत कार्यकर्ते बनलेले आहेत त्यांच्या सोबत एकनिष्ठेने पक्ष संघटनेत काम करून. स्व.देवानंद भाऊ कायंदे यांच्या नेतृत्वाखाली २०१७ची दुसरबीड जिल्हा परिषद सर्कलमध्ये निवडणूक लढवावी लागली होती .२०२३मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती ची निवडणूक लढवावी लागली होती कांग्रेस पक्षाचे वातावरण नसल्याने मला पराभव पत्करावा लागला. विद्यार्थी जिवनात ही जनरल सचिव या पदावर काम केले . विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळीमध्ये काम केले.विद्यार्थी संमेलनात तात्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांना आमंत्रित करून त्यांच्या हस्ते उद्घाटन केले. माझ्या जिवनात राजकीय सामाजिक क्षेत्रात काम करत असताना यश अपयश येत राहीले परंतु स्व.देवानंद भाऊ कायंदे यांच्या विचारांने प्रेरीत होऊन मला लढण्याचे बळ मिळत असे .या अनुषंगाने आमदार मनोज भाऊ कायंदे यांच्या नेतृत्वाखाली मि एकनिष्ठेने अनेक वर्षांपासून काम करत असताना . मला सावखेड भोई जिल्हा परिषद गट अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असल्याने उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा आहे. का आमदार मनोज कायंदे योग्य वेळी उमेदवारांची चाचपणी करून योग्य तोंच उमेदवार देतील येणारा काळच ठरवेल. दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क शी बोलताना प्रमेश्वर खंदारे यांनी सांगितले

**मिशन जिल्हा परिषद**
**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क ची खास मुलाखत**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कार्तिक यात्रा कालावधीत भाविकांच्या सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य

## प्रांताधिकारी– सचिन इथापे; कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत अधिकाऱ्यांना दिले निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, यात्रा कालावधीत ६५ एकर (भक्ती सागर), चंद्रभागा नदी पात्र, दर्शन रांग, प्रदक्षिणा मार्ग व मंदीर परिसर येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांची असते. यात्रेत भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देवून गर्दी व्यवस्थापनाबाबत सूक्ष्म नियोजन करावे.तसेच भाविकांच्या आरोग्य सुविधेसह स्वच्छतेला प्राधान्य देवून आवश्यक उपाययोजना कराव्यात अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.




कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दिपक धोत्रे, यांच्यासह संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रांताधिकारी इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेबाबतनगरपालिका व मंदिर प्रशासनाची महत्वाची जबाबदारी आहे.या कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, वाळवंटातील तसेच शहरातील अतिक्रमणे तात्काळ काढावीत.वाळवंटात पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे,धोकादायक इमारतींवर ठळक सूचना फलक लावावेत. अनाधिकृत फलक काढावेत.मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. मंदीर समितीने व नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्ग, नदीपात्रात आवश्यक ठिकाणी बॅरकेंटींग करावे व अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवावी .कार्तिकी यात्रा कालावधीत मंदीर समितीने जादाचे पत्राशेड, जर्मन हॅगर उभारावेत, दर्शन रांगेत ठिकठिकाणी सूचना फलक लावावेत. मंदीरात तसेच मंदीराभोवती करण्यात येणाऱ्या विद्युत रोषणाईचे फायर ऑडीट व स्काय वॉकचे स्ट्रॅक्चरल ऑडीट करुन घ्यावे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अपुर्ण कामे तात्काळ पुर्ण करावीत, चंद्रभागा बसस्थानकात बसेसना जाण्यासाठी येण्यासाठी तात्काळ रस्ता करावा. एस.टी महामंडळाने प्रवाशी वाहतुकीचे नियोजन करुन बसस्थानकावर आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात कार्तिक यात्रा कालावधीत वाखरी येथे जनावरांचा बाजार मोठ्या प्रमाणावर भरत असल्याने पशुसंवर्धन विभागाने पशुवैद्यकीय पथकांची नेमणूक करावी. तसेच संबधित विभागाने जनावरांच्या व पशुपालकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. अन्न व औषध प्रशासनाने शहर व परिसरातील खाद्य पदार्थांच्या दुकानांची तपासणी करावी. अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.



## दिवाळीनिमित्त पंढरपुरात बालचिमुरड्यांनी बांधला सुंदर किल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिवाळीच्या आनंदात पंढरपूर शहरात बालचिमुरड्यांनी उत्साहाने किल्ले बांधण्याची परंपरा यंदाही जोमात पाहायला मिळत आहे. शहरातील विविध भागात लहान मुलांनी माती, दगड, गवत, आणि घरातील साहित्य वापरून देखणे किल्ले उभारले आहेत.

या किल्ल्यांमध्ये शिवकालीन इतिहासाचे दर्शन घडवणारे दरवाजे, तोफा, आणि झेंडेही लावण्यात आले असून अनेकांनी छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती किल्ल्यावर प्रतिष्ठित केली आहे. काही ठिकाणी 'स्वच्छ भारत' आणि 'सेवाभाव' यांसारख्या सामाजिक संदेशांसह किल्ले साकारले गेले आहेत.

पालक आणि नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत बालचिमुरड्यांचा उत्साह वाढवला आहे. दिवाळीच्या सणात परंपरा, इतिहास आणि संस्कृती जिवंत ठेवणारी ही किल्ले बांधणीची प्रथा पंढरपूरमध्ये आजही उत्साहात सुरू आहे.

स्वस्तिक नागेश देवकर याचा किल्ला.

गुरुदेव नगर सांगोला रोड पंढरपूर

## श्री परमेश्वर देवस्थानच्या गोपूर बांधकामासाठी १११११११ रुपयांची मलप्पा शेळके यांनी दिले देणगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : दानशूर वृत्ती आणि समाजसेवेचा वारसा जपणारे वागदरी (ता. अक्कलकोट) येथील ज्येष्ठ उद्योगपती व समाजातील उदार व्यक्तिमत्त्व श्री मलप्पा शेळके (सावकार) यांनी पुन्हा एकदा आपली उदार वृत्ती सिद्ध केली आहे. त्यांनी श्री परमेश्वर देवस्थान, वागदरी यांच्या गोपूर बांधकामासाठी तब्बल ११११११ रुपये इतकी उदार देणगी देवस्थान समितीकडे सुपूर्द केली आहे.

या देणगीमुळे देवस्थान समितीमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी शेळके कुटुंबियांच्या या दातृत्वाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

विशेष म्हणजे, सध्याचे परमेश्वर मंदिराचे भव्य महाद्वार हे देखील अनेक वर्षांपूर्वी शेळके परिवाराच्या योगदानातूनच बांधण्यात आले होते. गावाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाशी निगडित असलेल्या या कुटुंबाने सातत्याने मंदिर विकास, सामाजिक कार्य, शिक्षण आणि दानधर्म या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.



शेळके कुटुंबीयांचे हे निस्वार्थ कार्य आणि धर्मभावनेतून केलेले दान हे सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. देवस्थान समितीच्या वतीने शेळके कुटुंबीयांचे विशेष आभार मानण्यात आले असून ग्रामस्थांकडून त्यांच्या या उदात्त कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण मंडळी आणि भक्तगण यांनी अशा उदार मनाच्या व्यक्तिमत्त्वामुळेच गावातील धार्मिक आणि सामाजिक परंपरा अधिक बळकट होत असल्याचे सांगितले.

श्री परमेश्वर देवस्थानच्या गोपूर बांधकामाचे काम आता वेगाने पुढे सरकणार असून, यामुळे वागदरी गावाचे धार्मिक वैभव अधिक वाढेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## कळंब येथे लोक जनशक्ती पार्टीच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/ सुधाकर रणदिवे : लोक जनशक्ती पार्टी( राम विलास पासवान) यांचा कार्यकर्ता मेळावा. आणि गायरान जमीन परिषद. कळंब जिल्हा धाराशिव.

मा. जिल्हा अध्यक्ष. राजाभाऊ अण्णा गायकवाड. यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २६/१०/०२५ रोजी वार रविवार ११:३० वाजता पंचायत समिती सभागृह कळंब येथे आयोजित करण्यात आलेला आहे. तरी कळंब तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून येणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपरिषद, जिल्हा परिषद निवडणूक कार्यक्रमाचे योग्य मार्गदर्शन मा. जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड हे करणार आहेत. तरी सर्वांनी उपस्थित राहावे. प्रमुख पाहुणे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रमोद कुदळे. प्रशांत ननवरे प्रदेश महासचिव महाराष्ट्र राज्य. प्रा. अशोक गायकवाड महासचिव प्रदेश अध्यक्ष सोलापूर. रामकुमार सोनवणे, महाराष्ट्र किसान सेल अध्यक्ष. प्रा. बी. पी. शिरसाट सर. जिल्हा अध्यक्ष लो. ज. पा.पार्टी. राजेश वाहुळे. किशोर वाघमारे.आयोजक, मुकेश गायकवाड. नागेश धीरे, बाबा टोपे, भारत कदम, सुनील गायकवाड, सुशील गायकवाड, दिनेश वाघमारे,धम्मदीप बचुटे, संजय गायकवाड,सतीश चंदनशिवे, निलेश गवळी, सुरज राऊत, बजरंग धावारे, बापू टोपे, श्याम, हौसलमल,सौ. रेखा चंदनशिवे, चांदणी सावंत, सुलभा गायकवाड, शितल गायकवाड, शिल्पा वाघमारे, व ईतर कार्यकर्ते मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज पुतळा शिवप्रेमी चौक, मंगळवेढा येथील आरावरण सोहळ्याच्या नियोजनाची आ. समाधान आवताडे यांनी केली पाहणी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा शहरातील शिवप्रेमी चौक येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्रु रूढ पुतळ्याची लोकार्पण येत्यात २६ ऑक्टोबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री ना.मा. श्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास जलसंपदा मंत्री मा.ना. श्री राधाकृष्णजी विखे पाटील, तसेच राज्याचे बांधकाम मंत्री मा. ना. श्री छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले महाराज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत याच पार्श्वभूमीवर पुतळा परिसर आणि हेलिपॅड परिसराची पाहणी करून लोकार्पण सोहळ्याच्या नियोजनाची आपले आमदार श्री समाधान दादा अवताडे यांनी पदी पदाधिकाऱ्यांसोबत उपस्थित राहून नियोजित कार्यक्रमाची सविस्तर माहिती घेतली. उस्तानिक प्रशासन, नगरपरिषद व बांधकाम विभागाद्वारे, उत्कृष्ट आयोजन व तयारी करण्यात येत आहे यावेळी संपूर्ण नियोजनाची पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांच्या नियोजना संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या निश्चितच छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक पुतळ्यामुळे मंगळा शहराच्या ऐतिहासिक वैभवता आणखी एक घर पडणार असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवाचा हा क्षण समस्त मंगळवेढकरांसाठी अभिमानाचा ठरणार आहे. या पाणी दरम्यान तहसीलदार श्री मदन जाधव, प्रांताधिकारी श्री बिहार माळी, पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रेय बोरिगिडे, तसेच नगरपरिषद व बांधकाम विभागाचे अधिकारी पुतळा समितीचे पदाधिकारी, राजकीय व सामाजिक कार्यक्षेत्रातील मान्यवर सहकार्य आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काँग्रेसचे माजी.जिल्हाध्यक्ष श्रिशैल्य आप्पा उटगे यांचे निकटवर्तीय बाळासाहेब सांगवे लढणार खरोसा जिल्हा परीषद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव :

खरोसा जिल्हा परीषद गटातुन खरोशाचे सुपुत्र बाळासाहेब सांगवे यांनी काँग्रेसकडुन निवडणुक लढवावी यासाठी जनतेचा आग्रह.



खरोसा जिल्हा परीषद गटासाठी सर्वसाधारण पुरुष आरक्षण सुटल्याने खरोसा येथील काँग्रेस चे कार्याध्यक्ष असलेले बाळासाहेब सांगवे यांना खरोसा जिल्हा परीषद ची उमेदवारी अशी जोरदार चर्चा खरोसा गटात पहायला मीळत आहे ,बाळासाहेब सांगवे यांनी अनेक वर्षापासुन काँग्रेस पक्षासाठी काम केल असुन .सहकार महर्षी दिलीपराव देशमुख .लातुरचे आ अमित भैया विलासराव देशमुख .जिल्हा बॅकेचे अध्यक्ष तथा ग्रामिनचे माजी.आ धिरज विलासराव देशमुख .कॉग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके .व काँग्रेसचे माजी.जिल्हाध्यक्ष श्रिशैल्य आप्पा उटगे याच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षाला जिल्यात व औसा तालुक्यात पक्षाला बळकटी देण्यासाठी व संघटन मजबुतीसाठी बाळासाहेब सांगवे यांनी काम केल असुन .पक्षनिष्टा काय असते व एकनिष्ठेने काम कस करायच याच ज्वलंत उदाहरण महनजे बाळासाहेब सांगवे .खरोसा गावचे रहिवाशी असलेले बाळासाहेब सांगवे हे सांप्रदायीक व धार्मिक कुटुंबातुन येतात तीन पिढ्यापासुन त्यांच्या घराण्याला सांप्रदायीक वारसा असुन . बाळासाहेब सांगवे यांचे आजोबा ,वडील हे निस्सीम अशी किर्तनसेवा .भजन .सह सांप्रदायात एक नावलौकीक असलेल नेतृत्व होते .तोच पारंपारीक वारसा चालवत बाळासाहेब सांगवे हेही सांप्रदायात सामील असतात .खरोसा परीसरात सप्ताह ,यात्रा ,सारख्या धार्मीक कार्यात ते सढळ हाताने अर्थसहाय करतात व वेळेत वेळ काढुन सर्वसामान्याच्या सुख दुख्खात सहभागी होतात ,निर्व्यसनी ,निस्वार्थी निश्कलंक ,व युवा पीढीला चांगल्या विचारांची देवान घेवान करणारे ,सर्वांना आपलस मानुन मनोभावे जनतेची सेवा करणारे सर्वाच्या गळ्यातील ताईत असलेले बाळासाहेब सांगवे यांनी खरोसा जिल्हा परीषद गटात काँग्रेस पक्षाकडुन निवडणुक लढावी अशी मागणी सर्वसामान्य मतदार व लोकांतुन केली जातेय ,तस पहायला गेल तर बाळासाहेब सांगवे यांना कुटलाही राजकीय वारसा नसुन दैनंदिन जिवनात कुटलाही कुटेही स्वार्थ न ठेवत निस्वार्थ पणे सर्वांना सोबत घेउन चालणारे बाळासाहेब सांगवे ,यांना जिल्हा परीषदेत पाठउन त्यांनी सर्वसामान्य जनेतेची सेवा करावी

असा आग्रह बाळासाहेब सांगवे यांना काँग्रेसने उमेदवारी द्यावी व आम्ही बाळासाहेब सांगवे यांना निवडुण आनुन पक्षाने दिलेल्या संधीच सोन करु असा आग्रह खरोसा गटातील जनतेचा असल्याच प्रसारमाध्यमांना पहायला मीळाले . तरी जनतेची भावना लक्षात घेता कॉग्रेस पक्षश्रेष्ठीने बाळासाहेब सांगवे यांना उमेदवारी द्यावी असा आग्रह सर्वसामान्य मतदार व खरोसा गटातील ग्रामस्थ करत आहेत.

### चालू गळीत हंगाम करिता ६ लाख मे. टन.पेक्षा जास्त गाळपाचे उद्दिष्ट — उमेश परिचारक यांची माहिती

# युट्युपियन शुगर्सचे मोळी पूजन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी




कचरेवाडी तालुका मंगळवेढा येथील युट्युपियन शुगर्स लिमिटेड या कारखान्याच्या २०२५/ २०२६ या बाराव्या गळीत हंगामाच्या मुळीपूजन समारंभ शुक्रवारी दिनांक २४ /१० /२०२५ रोजी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांचे शुभ असते उत्साही वातावरणात संपन्न झाले. यावेळी बोलताना चेअरमन श्री उमेश परिचारक म्हणाले की, आपल्या कारखान्याचा हा बारावा गळीत हंगाम आहे चालू गळीत हंगामात सहा लाख मॅट्रिक टन. पेक्षा जास्तीचे गाळप करू शासनाने दिनांक एक नोव्हेंबर २०२५ पासून गाळप परवाना दिलेला आहे त्यामुळे चांगल्या रिकवरीचा ऊस मिळेल. चालू गोळीत हंगामात उसाची उपलब्धता चांगली असून गत ११ ही हंगामात ऊस उत्पादक युट्युबियन कारखान्यास ऊस देण्यास प्राधान्य देतात यापुढेही देतील अशी आशा खात्री आहे यावेळी हंगामात कारखान्याचे मार्गदर्शक आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या सूचना असो पंढरपूर मंगळवेढा सांगोला मोहोळ तालुक्यातील कारखान्याच्या ऊस उत्पादक शेतकरी यांचा संपूर्ण ऊस गाळ केला जाईल त्यामुळे ऊस उत्पादकांनी चिंता न करता कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधावा असे आव्हान श्री परिचारक यांनी केले. कारखान्याचे यावर्षी दहा हार्वेस्टर मशीन घेतलेले आहेत. तसेच अडीशे ट्रॅक्टर्स, दीडशे मिनी ट्रॅक्टर याप्रमाणे करार केले आहेत यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक म्हणाले की संपूर्ण उत्साहाचे गाळप करण्यासाठी कारखाना यंत्रणा सज्ज आहे व पहिल्या दिवसापासून कारखाना पूर्ण क्षमतेने चालवली सर्व कामगारांना वर्ग मिळवून हा चालू गोळीत हंगाम यशस्वी करतील अशी खात्री त्यांनी व्यक्त केली व या कार्यक्रमासाठी कारखान्याचे ऊस उत्पादक शेतकरी तोंडी वाहतूक ठेकेदार खाते प्रमुख कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईडीपी मॅनेजर अभिजीत यादव यांनी केली व आभार मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहार यांनी केली.

# शेतकऱ्यांना १०६ कोटींची नुकसानभरपाई अक्कलकोटला जिल्ह्यात सर्वाधिक मदत

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची माहिती; येत्या दोन-तीन दिवसात रक्कम जमा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधीः ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून एकूण १०६ कोटी ५८ लाख ६१ हजार ६८७ रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली असून, ती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनाही येत्या दोन ते तीन दिवसांत रक्कम खात्यात जमा होणार असल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पाडव्याच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेत दिली.

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील एकूण बाधित शेतकऱ्यांची संख्या १ लाख ३ हजार ७७९ इतकी आहे. त्यापैकी ९९ हजार ८०८ शेतकऱ्यांना शेतीतील नुकसान, १ हजार ४६९ जणांच्या घरात पाणी शिरल्याने बाधा, तर २ हजार ४७३ शेतकऱ्यांची घरे पडझडीत कोसळली आहेत. तसेच २९ जनावरे मृत्यूमुखी पडल्याची नोंद प्रशासनाकडे आहे.



शेतकऱ्यांना मिळणाऱ्या एकूण रकमेपैकी १०३ कोटी ६१ लाख १२ हजार १८७ रुपये शेती नुकसानभरपाईसाठी, १ कोटी ४६ लाख ९० हजार रुपये घरात पाणी शिरल्यामुळे, तर १ कोटी ४१ लाख ४२ हजार रुपये घर पडझडीसाठी वितरित होणार आहेत. याशिवाय मृत जनावरांसाठी ९ लाख १७ हजार ५०० रुपये मदत म्हणून मंजूर झाले आहेत.

या सर्व योजनांअंतर्गत सध्या ६१ हजार खातेदारांच्या याद्या ऑनलाइन अपलोड केल्या गेल्या असून, अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत सर्व शेतकऱ्यांना ही मदत पोहोचेल, असा विश्वास आमदार कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला.

अक्कलकोट मतदारसंघातील एकूण १ लाख १२ हजार ७५० हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले होते. विशेषतः बोरी, हरणा आणि भीमा नदीकाठच्या भागात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते.

या सर्व परिस्थितीचा विचार करून राज्य सरकारने दोन हेक्टरपर्यंतच्या शेतजमिनींसाठी नुकसानभरपाई निश्चित केली आहे. यानंतर एक हेक्टरपर्यंतची वाढीव मर्यादा लागू करण्याचा निर्णयही झाला असून, त्यामुळे शेतकऱ्यांना एकूण तीन हेक्टरपर्यंत भरपाईचा लाभ मिळणार आहे. या निर्णयाचे स्वागत करताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारने घेतलेला हा निर्णय शेतकऱ्यांच्या आयुष्यात दिलासा देणारा ठरेल.

अक्कलकोट तालुक्यातील नुकसानग्रस्त क्षेत्रात प्रशासनाने २४ तास कार्यरत राहून सर्व पंचनामे पूर्ण केले. महसूल विभाग, कृषी अधिकारी, ग्राम पंचायती आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे नुकसानभरपाई प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली असल्याचे आमदारांनी सांगितले. अक्कलकोट तालुक्याला मिळालेली नुकसानभरपाई ही संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक रक्कम आहे, हे आमच्या क्षेत्रासाठी अभिमानास्पद आहे,असेही आमदार कल्याणशेट्टी म्हणाले.सरकारने शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जे प्रयत्न केले, त्याचा खरा लाभ येत्या काही दिवसांत दिसून येईल.ऐन दिवाळीत शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा होत असल्याने ही दिवाळी त्यांच्या चेहऱ्यावर खरा उजेड आणणारी ठरेल, असे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेत माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, भाजप शहर मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील,माजी तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड,माजी शहराध्यक्ष शिवशरण जोजन आदी उपस्थित होते.

## वंचित बहुजन आघाडी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूका मोठ्या ताकदीने स्वबळावर लढणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील येणाऱ्या काळातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या व नगर पालिकेच्या निवडणुका या स्वबळावर लढविणार असल्याचे पाठिमागे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकरांनी घोषित केले होते. आणि भाजप सोडून बाकीच्या सर्व पक्षांशी युतीचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्यात आले आहेत. या आदेशाचे पालन बऱ्याच जिल्ह्यांमध्ये आणि तालुक्यांमध्ये करण्यात आले. याचेच अनुकरण करत आज करमाळ्या मध्ये येणाऱ्या नझ आणि पंचायत समितीच्या व नगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका या स्वबळावर लढवू आणि कोणताही पक्ष किंवा गट युती करण्यास एछुक असेल तर काही विचार विनिमय करून त्यांच्याशी युती करु ते पण भाजप सोडून अशी घोषणा करमाळ्याती वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष ओहोळ यांच्या कडून असे सांगण्यात आले आहे की बाळासाहेब आंबेडकरांच्या मते वंचित बहुजन आघाडी हा पक्ष कोण्या एका जातिचा नाही तर तो सर्व जाती धर्मातील शोधीत, पिडीत व वंचित लोकांचा पक्ष आहे. महाराष्ट्रामध्ये मराठा ओबीसी वाद पेटला आहे याच्या कडे लक्ष न देता करमाळा तालुक्यांमध्ये सर्वसाधारण जागे मध्ये योग्य उमेदवार उभा करणार आहोत असे ही सांगण्यात आले.

या वेळेस वंचित बहुजन आघाडीचे विशाल लोंढे ( शहर अध्यक्ष) , प्रविण मखरे , अतुल गायकवाड, नामदेव पालवे , जिल्हासंघटक देविदास भोसले , तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण भालेराव, आदिवासी समाजातील पप्पू काळे, लखन पवार, धनगर समाजातील नेते आबासाहेब भिसे, कामोणे नवनाथ भालेरा आदी मान्यवर व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### पडघ्यात मातीच्या किल्ल्यांची परंपरा कायम

# तरुणाईने उभारले ऐतिहासिक किल्ले




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

### पन्हाळगड ते सिंधुदुर्गपर्यंत किल्ल्यांच्या प्रतिकृतींनी दिवाळीचा उत्सव उजळला

दिवाळीच्या सणात पारंपरिक मातीचे किल्ले बांधण्याची परंपरा आजही पडघा परिसरात जोमात दिसून येते. ऐतिहासिक वारसा जपण्याच्या आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण ठेवण्याच्या उद्देशाने पडघ्यातील तरुणाई आणि बालमंडळींनी यंदाही विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारल्या आहेत.

ब्राह्मण आळीतील मिहिर राऊत आणि निल राऊत यांनी 'पन्हाळगड' किल्ल्याची प्रतिकृती तयार केली असून, ध्रुवांग थोरे, दीप कांबळे, अर्पित पाठक, आयुष लोंढे, मित थोरे, जतीन लोंढे आणि संकेत राठोड यांनी 'मुरुड-जंजिरा' किल्ला उभारला आहे. सोनारआळीत रोहित कांबळे, गायत्री महाजन,चैतन्या महाजन, सही कांबळे,प्रिया कांबळे, तनिष्का जोशी लाभश्री जोशी, सार्थक हाडपे शौर्य हाडपे , प्रियांश्री पातकर यांनी 'मल्हारगड (सोनेरी किल्ला)' साकारला. शास्त्रीनगरातील स्वराज दळवी यश दळवी यांनी 'सिंधुदुर्ग' किल्ला उभारला, तर रोहिदास नगरातील वेदांत भोईरने 'विजयदुर्ग' किल्ल्याची प्रतिकृती साकारली. याच भागातील श्लोक जाधव, मंथन जाधव राज जाधव, कौस्तुभ जाधव,यज्ञेश जाधव, यश जाधव यांनी 'राजगड' किल्ला उभारला आहे. बालाजी नगरातील वेणुबाई मित्र मंडळाच्या वतीने अनुष्का दिनकर, गणेश मूडे, सोहम आणि सक्षम कदम, लाभेश कदम, पियुष आणि दिव्या जाधव, वेद पितांबरे, पराग तावडे, निधी दिनकर आणि संग्राम पाटील यांनी 'सिंधुदुर्ग' किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारली. या किल्ल्यांच्या माध्यमातून तरुणाईने इतिहासाचा अभिमान जागवण्याबरोबरच देशभक्तीची भावना वृद्धिंगत केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि शूर मावळ्यांच्या मूर्तींसह सजवलेले हे किल्ले दिवाळीच्या सणाला सांस्कृतिक आणि ऐतिहासिक तेज देत आहेत.

# दीपावली - बलीप्रतिपदा दिवाळी पाडवा निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सावळें सुंदर रूप मनोहर! दीपावली पाडवा निमित्त आज श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेस हिरेजडित सुवर्ण अलंकारांनी सुशोभित करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही दीपावली बलीप्रतिपदा / दिवाळी पाडवा या पवित्र दिवशी दुपारी पोशाखावेळी पारंपरिक पद्धतीने श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे प्रभारी व्यवस्थापक श्री पृथ्वीराज राऊत यांनी दिली.





**श्री विठ्ठलास आज परिधान केलेले अलंकार :** सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या, हिऱ्याची कंगन, मोत्याची कंठी, मोत्याचा तुरा, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे, हिऱ्याचा कंबरपट्टा, मोर मंडोळी, तुळशीची माळ, अष्टपैलू मन्याची कंठी, बाजीराव कंठी, नवरत्नाचा हार, तसेच सोन्याचे पितांबर.

**श्री रुक्मिणी मातेस आज परिधान केलेले अलंकार :** मुकुट, मोठी नथ, कर्णफुले जोड, मत्स्य जोड, हातसर, शिंदे हार, नवरत्नाचा हार, चिंचपेटी, पाचूची गरसोळी, खड्याच्या पाटल्या, सूर्य, चंद्र, मद्रासी कंठा, दशावतारी हार, हार, बिंदी, बाजीराव गरसोळी, मास पट्टा, तारामंडल, तोडे, रूळ, सोन्याचा करंडा, साखळी, बाजूबंद जोड, खड्याची वेणी, सोन्याची साडी तसेच छत्र-छामर.

श्री राधिका मातेस परिधान केलेले अलंकार :नक्षी टोप, हायकोळ, लक्ष्मीहार, जपेची माळ.

श्री सत्यभामा मातेस परिधान केलेले अलंकार :सिद्धेश्वर टोप, जपेची माळ, पुतळ्यांची माळ, चिंचपेटी व पदक.

या पवित्र दिवशी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस मंदिरातील खास ठेवणीतील अनमोल सुवर्ण व हिरेजडित दागिने परिधान करण्यात आले आहेत. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे हे दिवाळीचे सुवर्णरूप पाहण्यासाठी देशभरातून हजारो भाविकांनी गर्दी केली असून, दर्शन घेण्यासाठी आलेल्या भाविकांमधून देवाचे सुवर्णरूप पाहून समाधान लाभले असे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे, अशी माहिती कार्यकारी अधिकारी श्री राजेंद्र शेळके यांनी दिली.

# चालक गुडघे यांची चौकशी करून न्याय देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड तालुक्यातील आरोग्य उपकेंद्रामध्ये १०२ चा वाहन चालक यांनी महिलेशी गैरवर्तन केल्याचा आरोप आशा वर्कर महिलेने केला असून याबाबत निफाड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे या घटनेची योग्य चौकशी करून १०२ चा वाहन चालक गुडघे यांना न्याय द्यावा यासाठी वाहन चालकांच्या वतीने निफाड पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले

सदर निवेदनात म्हटले आहे की १०२ चा वाहन चालक भाऊसाहेब गुडघे यांचे वर खोटा गुन्हा दाखल केला आहे अशी कुठलीही प्रकारची घटना झालेली नाही सदर प्रसंगी गाडीमध्ये वाहन चालक भाऊसाहेब गुडघे सोबत रोहिदास साळवे हा कर्मचारी उपस्थित होता तो गाडीमध्ये पुढे बसलेला होता व आशा सेविका मागे बसलेली होती त्यामुळे फिर्यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे कुठलीही घटना झालेली नाही तरी सदर गुन्ह्याची व्यवस्थित चौकशी करून



वाहन चालक भाऊसाहेब गुडघे यांना न्याय द्यावा अशी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे,

निवेदनात भास्कर गायकवाड,भूषण गायकवाड, रोहिदास साळवे, पंडित जाधव, दयाराम शिरसाट, समाधान शेवाळे ,विजय अहिरे, संजय कुराडे ,विष्णू महाले, अमोल नाठे, निलेश कोरडे ,ज्ञानेश्वर सोनवणे ,दत्तात्रय पवार ,नवनाथ नवले, विकास गडाख , आदी वाहन चालकांच्या सह्याआहेत

### सांस्कृतिक कार्यक्रमातून इतिहासाची उजळणी

### शेतकरी-कष्टकरी समाजाच्या संस्कृतीचे दर्शन

# भिवंडी तालुक्यात 'बळी पहाट' मोठ्या उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

आपण समाजाचे देणे लागतो. समाजामध्ये वावरत असताना प्रबोधन व परिवर्तन झाले पाहिजे या उद्देशाने शेती संस्कृती, कृषी संस्कृती जपणाऱ्या, शेतकरी-कष्टकरी समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा, मनोरंजनातून प्रबोधन घडविणारा व इतिहासाचा वेध घेण्यासाठी ओबीसी संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ कलामंच प्रस्तुत मनोरंजनातून प्रबोधन घडविणारा सांस्कृतिक बळी पहाट कार्यक्रम २२ ऑक्टोबर २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील चौधरपाडा येथे शेकडो नागरिकांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे लेखक दिग्दर्शक, निवेदक प्रमोद जाधव यांनी बोलताना सांगितले की बळीराजाच्या बाबतीत भाबड कथांवर विश्वास न ठेवता खऱ्या इतिहासाचा शोध घेणे गरजेचे आहे. तुकोबारायांच्या अभंगांचा दाखला देत त्यांनी बळीराजाच्या स्मृतींना उजाळा दिला. सादरीकरणातून शेतकरी वर्गाचे दुःख व संघर्ष, बळीचे राज्य येण्याची लोकांची आस, तसेच शिवराय-संभाजी महाराज, जिजाऊ, महात्मा फुले,सावित्रीबाई, रमाई, राजश्री शाहू महाराज यांच्या कार्याचे स्मरण, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या स्वातंत्र्य-न्याय-समता-बंधुभावाच्या मूल्यांचा जागर करण्यात आला. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊनच ओबीसी समाजाने आपले अधिकार संघटितपणे मागणे आवश्यक आहे, हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

या कार्यक्रमातून ओबीसी जनजागृती हा मुख्य विषय मांडण्यात आला. ओबीसींचे आरक्षण कशाप्रकारे संपविण्याचा प्रयत्न सुरू आहे, हे उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. त्याचबरोबर जातनिहाय जनगणनेचे महत्त्व अधोरेखित करत, सामाजिक न्याय आणि हक्कांच्या लढ्यासाठी ती किती आवश्यक आहे हे प्रभावीपणे मांडण्यात आले.

गेल्या दहा वर्षांपासून ओबीसी संघर्ष समिती रस्त्यावर उतरून ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर लढा देत आहे. समाजाला त्यांच्या संविधानिक हक्कांची जाणीव करून देण्यासाठी, शिक्षण-आरक्षण-राजकीय प्रतिनिधित्व या विषयांवर सतत जनजागृती करत आहे. बळी पहाट हा त्याच चळवळीचा एक विस्तार ठरला.

बळी पहाट या कार्यक्रमाचे लेखन, दिग्दर्शन आणि निवेदन प्रमोद जाधव यांनी केले. निवेदक राजेंद्र पाटील, साधना भेरे, ज्योती दवणे, नीलम भोईर , साक्षी वाघेरे यांच्या प्रभावी सादरीकरणाने कार्यक्रम रंगला, तर गायक अरुण गगे, दिनेश भोईर, संतोषी जाधव आणि रुपाली जाधव यांच्या मधुर आवाजाने वातावरण मंत्रमुग्ध झाले होते. राजमाता जिजाऊ कलामंचच्या नृत्यकलाकारांनी सादर केलेल्या नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.




बळी पहाट हा केवळ मनोरंजन करणारा नव्हे, तर शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या संस्कृतीचा तसेच ओबीसी समाजाच्या प्रश्नांचा वास्तवदर्शी दस्तऐवज ठरला. उत्कृष्ट नियोजन, विचारपूर्वक संहिता, प्रभावी सादरीकरण आणि सामाजिक आशय यामुळे हा सांस्कृतिक आविष्कार प्रेक्षकांच्या कमालीच्या पसंतीस उतरला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयवंत पाटील, कुंडलिक पाटील, पंडित पाटील, योगेश पाटील, विनोद भोईर, राजेंद्र पाटील, अशोक पाटील, संदीप वाघेरे, अजय किरपण, शाम पाटील, रुपेश मांजे, दत्ता दवणे, तुषार शेलार आदी कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.